Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- II FEBRUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# लीळाचरित्रातील समाजदर्शन

**नवनाथ किसन गुंड**
क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय,
कुंडल.

चक्रधरांच्या काळात महाराष्ट्रात यादवांची राजवट होती. या काळातील समाजाचे यथार्थ चित्रण आले आहे. अन् म्हणूनच यादव काळातील महाराष्ट्राच्या समाजजीवनाच्या अभ्यासाचे एक साधन या दृष्टीने चरित्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्या वेळचा समाज कसा होता? जाती व्यवस्था कशी होती? कोणते व्यवसाय केले जात होते? कोणत्या रूढी परंपरांचे पालन केले जात होते? स्त्रियांना कशा प्रकारची वागणूक दिली जात होती? धार्मिक आचरण कसे होते? आर्थिक परिस्थिती कशी होती? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे लीळाचरित्र या ग्रंथातून शोधता येतात. त्याकाळच्या एकूण समाजजीवनाचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**सामाजिक जीवन:-**

चक्रधरांच्या काळातील समाज अज्ञानी अन् अडाणी होता. शिक्षणाचा फारसा प्रसार नव्हता. ब्राम्हण वर्ग मात्र सुशिक्षित होता. वेद पुराणांचा अभ्यास त्यांनी केला होता. इतर समाज मात्र सर्वार्थाने मागासलेला होता. चातुर्वण्य पद्धती अस्तित्वात होती. समाजात ब्राहमणांना श्रेष्ठत्व होते. त्यांना दानधर्म करण्याची प्रथा होती.

ब्राम्हणांच्या आशीर्वादासाठी लोक नाना प्रकारची संपत्ती त्यांना दान देत असत. त्याकाळी अंधश्रद्धेचे प्रचंड प्राबल्य होते. भुताखेतांवर माणसांचा विश्वास होता.

भूतबाधा झाल्याची अनेक उदाहरणे लीळाचरित्रात आहेत. क्षुद्र देव-देवतांचा सुळसुळाट झाला होता. देवांना प्रसन्न करण्यासाठी प्राण्यांचा बळी देण्याची प्रथा सर्रास होती. स्वप्न, शकुन, अपशकुन, दृष्ट लागणे, मंत्र-तंत्र, करणी, भानामती इत्यादी गोष्टींवर लोकांचा प्रचंड विश्वास होता. त्यावर उपाय करणारे मांत्रिकही त्याकाळी अस्तित्वात होते. अनेक प्रकारच्या रोगराईनी माणसे त्रस्त होती. औषधापेक्षा मंत्र-तंत्र, उतारा, अंगारा, उदी, भस्म यांचा वापर करून रोग बरा करण्याकडे लोकांचा कल होता. मुले होण्यासाठी देवाला नवस करण्याची प्रथा होती. मुले जगत नसल्यास, पुढे जन्मलेल्या मुलाचे नाव दगडू, धोंडू, गुंडू अशी नावे ठेवण्याची प्रथा होती. अशी नावे ठेवल्याने मुले जगतात अशी समजूत होती. चमत्कारावर लोकांचा विश्वास होता. परकाया प्रवेश याचाही लोक स्वीकार करीत असत. पुनर्जन्म ही कल्पना लोकांनी स्वीकारली होती. पुण्यवान स्वर्गात जातो तर पापी माणूस नरकात जातो ही बाब लोकांच्या मनात खूप खोलवर रुजली होती. आत्मज्ञानासाठी एखाद्या गुरुची गरज आहे लोकांनी जाणले होते. गुप्तधन, वशिकरण, सांकेतिक भाषा, जारण-मारण, लागीर या गोष्टीवर लोकांचा विश्वास होता. थोडक्यात, समाज हा श्रद्धा, अंधश्रद्धा, पाप-पुण्य, स्वर्ग- नरक, जादू-टोणा, भूत यावर विश्वास ठेवणारा होता. यासंदर्भात लीळाचरित्रात अनेक ठिकाणी स्पष्ट असे उल्लेख आले आहेत.

**स्त्री जीवन:-**

या काळात सामान्यपणे एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. कर्त्या पुरुषाकडे कुटुंबाची सारी सत्ता होती. कुटुंबाच्या कुलाचराना महत्त्व होते. प्रत्येक कुटुंबाचे कुलदैवत होते. त्याची उपासना करण्यात लोक कुचराई करीत नसत. घरातील स्त्री पतीच्या आज्ञेत राहत असे. पती- पत्नी, भावंडे यांच्यात संघर्ष होत होता. निराश्रित म्हणून माहेरून आणलेल्या अलंकारावर स्त्रीचा हक्क असे. निराधार स्त्रियांची स्थिती मात्र हलाखीची होती. सासू-सासऱ्यांचा सुनेकडून छळ होत असे. विधवांना समाजात प्रतिष्ठा नव्हती. संन्यास घेतलेल्या पुरुषांच्या स्त्रियांना हलाखीचे जीवन जगावे लागत असे. अनेक स्त्रिया छळाला कंटाळून मठांच्या आश्रयाला येत असत.

स्त्रियांकडे पाहण्याची पुरुषांची दृष्टी उपेक्षेची असे. घर सांभाळण्यापलीकडे तिला कोणते काम दिले जात नसे. स्त्रियांना पुरुषी संशयी स्वभाव चा त्रास होत असे. विवाह करताना जेवढी दक्षता घ्यायला हवी तेवढी घेतली जात नसे... त्यामुळे अनेकांचे वैवाहिक जीवन सुखाचे नव्हते. घरी अपत्यांची संख्याही खूप असे. छोट्याशा कारणावरून स्त्रियाना घराबाहेर काढले जात असे. थोडक्यात थोडे चांगले व बरेचसे वाईट अशी अवस्था प्रत्येक कुटुंबाची होती.

**आर्थिक जीवन :-** यादवकालीन समाज हा कृषिप्रधान असल्याने शेती हाच त्याकाळचा प्रमुख व्यवसाय होता. शेतीच्या संदर्भातील अनेक उल्लेख लीळाचरित्रात सापडतात. कापूस, भात, ज्वारी, नाचणी, बाजरी, तीळ, शेंग इ. पिके घेतली जात होती. शेतीची औजारे लाकडी होती. शेती करण्यासाठी बैलांचा वापर केला जात असे. जमिनीची नांगरट, खांदणी, पेरणी यांचे उल्लेखही इथे आले आहेत. धान्य साठविण्यासाठी कणगी किंवा पेवांचा वापर केला जात असे. काही शेतकरी फुलशेतीही करीत असत. त्या काळीही, अत्यंत कष्ट करूनही शेतकरी दरिद्रीच होता.... कर्जात बुडाला होता. कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपली शेती विकल्याची उदाहरणे आहेत.

शेती व्यतिरिक्त विणकऱ्याचा व्यवसायही बरेच जण करताना दिसतात. वाणी, परीट, पुजारी, गुरव, लोहार, सुतार, कुंभार, कापडाचे व्यापारी, सोनार, पुराणिक, भटजी, सावकार, बडवे इ. चे उल्लेख ठिकाणी आल्याने हे सारे व्यवसाय त्याकाळी अस्तित्वात होते असे अनुमान काढण्यास हरकत नाही. व्यवसायाबरोबरच व्यापारही अस्तित्वात होता. अशा व्यापाऱ्यांचा उल्लेख वाणी म्हणून केला जात असे. शेतमजुरी करणारेही त्यावेळी अस्तित्वात होते. त्यांना मिळणारी मजूरी त्या काळात अपूरी होती. सावकारांचा उल्लेख काही ठिकाणी भांडारी असा आला आहे. दुसी म्हणजे कापडाचा व्यापारी, 'लाटी' म्हणजे तेल्याचा घाणा, 'हाटा' म्हणजे बाजाराची जागा... अशा या उल्लेखातून त्यावेळच्या व्यवसायांची कल्पना येते. व्यापार व्यवसाय म्हटले की देवघेव आली. देवघेवीच्या व्यवहारासाठी नाणी वापरली जात. त्याकाळी रुवा, दाम, आसू ही नाणी प्रचलित होती. तसे काही उल्लेख लीळाचरित्रात आले आहेत. प्रवासामध्ये खर्चासाठी काहीच पैसे नसल्याने स्वामींनी आपला आडकित्ता आठ दामास घाण ठेवल्याचा उल्लेख दोनदा आला आहे. आसूचे वस्त्र अर्पण केल्याचा उल्लेखही येथे आला आहे. रिधपूरास श्रीगोविंदप्रभूंच्या दर्शनासाठी जाताना, मागे मठाच्या व्यवस्थेसाठी स्वामीनी हासूबाईसाकडे सोळा दाम दिल्याचा उल्लेख आहे. यातील आसू हे नाणे सोन्याचे असल्याचा उल्लेख १९० क्रमांकाच्या लीळेत आला आहे. काही ठिकाणी बाजारभावाचे अप्रत्यक्ष उल्लेख आले आहेत. उदा. दोघाचौघांना दोनचार दिवस पुरेल इतके धान्य बाईसा आठ दामात घेते असा उल्लेख २७ नंबरच्या आला आहे. गावात बाजारासाठी निश्चित जागा होती.

इतकेच नव्हे तर विशिष्ट अशा बाजारपेठा अस्तित्वात होत्या. एका लीळेमध्ये 'रांधवण हाटा' चा उल्लेख आहे. 'हलवाईचा बाजार' हा त्याचा अर्थ आहे. मालवाहतुकीसाठी कर द्यावा लागत असे. कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याला 'सुंकी' म्हणत. वाहतूकीसाठी बैल, घोडे, गाढवे यांचा उपयोग केला जात असे. कापूस मोजण्याचे परिमाण ' विटी', 'गाठ', 'गाठोडे' असे होते. थोडक्यात यादवकालीन राजवटीत वर उल्लेख केलेले व्यवसाय केले जात होते.

**धार्मिक जीवन :-**

कोणत्याही धर्मविषयक कल्पनांचा गाभा परमेश्वर असतो व बहुतेक सर्व धार्मिक आचार परमेश्वराच्या सगुण रुपाभोवती केंद्रित झालेले असतात. यादव कालीन समाजही याला अपवाद नाही. त्यांचे धार्मिक जीवन देवाच्या सगुणोपासनेने भरलेले आहे. गावा गावात अनेक देव-देवतांची मंदिरे होती. मंदिरांची देखभाल करण्यासाठी व पूजापाठ करण्यासाठी पुजारी, गुरव, भटजी यांची नियुक्ती केली जात होती. देवळाच्या व्यवस्थेचा खर्च भागविण्यासाठी त्यांना जमिनी दिल्या जात होत्या. एकूणच यादवकालीन समाज हा धार्मिक वृत्तीचा होतो होता. तीर्थक्षेत्री व्रतस्थ राहणारे लोक होते. तीर्थयात्रा करण्याकडे लोकांचा कल होता. लीळाचरित्रात श्रीचक्रधरांच्या तीर्थयात्रेची वर्णने आली आहेत. लोक मेळाव्याने, म्हणजे एकत्रितरीत्या तीर्थयात्रेला जात असत. मातापूर, रामटेक, द्वारावती आधी ठिकाणांच्या तीर्थस्थळांना लोक श्रद्धेने जात असत. प्रवासात श्वापदांचा त्रास होत असे म्हणूनच कदाचित एकट्याने तीर्थयात्रा केली जात नसावी. यात्रेच्या मार्गावर पाणपोया होत्या. प्रवासासाठी श्रीमंत लोक पालखीचा वापर करीत असत. राजे लोक आपला प्रतिनिधी म्हणून पुरोहितास यात्रेस पाठवीत असत. यादव काळात निरनिराळ्या धार्मिक साधनांच्या कल्पना समाजात प्रचलित होत्या. चक्रधरस्वामी एका नवीन धर्मपंथाची उभारणी करीत असताना समाजात निरनिराळे धार्मिक पंथ व संप्रदाय अस्तित्वात होते. पयोवृती, मोनवृत्ती, भिक्षावती, जोगी, अवधूत, विद्यावंत, मासोपावसी यासारख्या भिन्न पंथियांचे उल्लेख येथे आले आहेत. धार्मिक जीवनातही दांभिकपणा होताच खरा तत्वनिष्ठ संन्यासी अभावानेच आढळत होता. अहंमान्य, घमेंडखोर, मत्सरी, सुखलोलुप अशा डोंगी संन्याशांची संख्या प्रचंड होती. या काळात अनेक धार्मिक व्रतवैकल्ये रूढ होती. एकादशी, अनंतचतुर्दशी, चातुर्मास यांचे उल्लेख या ग्रंथात आले आहेत. धर्मविषयक अंधश्रद्धाही प्रचंड प्रमाणात होत्या. धर्माला अनुसरून अनेक रूढी अस्तित्वात होत्या. देवधर्मा बरोबरच लोक गुरूंना मान देत असत. गुरु हा देवाची भेट घडवून आणणारा मार्गदर्शक आहे ही कल्पना मनात खोलवर रुजली होती.

देमाइसेसारखी स्त्री 'गुरुविण मुचिजेना' असे समजून गुरूच्या शोधात भटकत होती. लीळाचरित्रात, खुद्द चक्रधर, त्यांचे गुरु श्री गोविंदप्रभू , चांगदेव राऊळ यांचे उल्लेख अत्यंत सविस्तरपणे आले आहेतच पण त्या शिवाय नग्नावस्थेत राहणारे वामदेव, बाल्हेगावचा पाखंडी महात्मा, मत्सरी सारस्वत भट अशा अनेक गुरूंचे उल्लेख आले आहेत. गुरूही भक्तांची योग्यता पाहून मार्गदर्शन किंवा उद्देश करीत असत, एकूणच लीळाचरित्रात गुरु महात्म्याला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

**संस्कृतिक जीवन :-**

लीळाचरित्रात यादवकालीन संस्कृतीची अनेक वैशिष्ट्ये आली आहेत. स्थापत्यविषयाचा विचार करता नगरे, गावे, त्यांची रचना, घरे, देवळे, रस्ते यांचे उल्लेख आले आहेत. गावा भोवतालची तटबंदी, त्याचे दरवाजे, घराची रचना, त्यात पडवी, माजघर, देवघर, घराभोवती कुंपण यांची वर्णने आली आहेत. समाजात

प्रचलित असलेल्या लोककथा, लोकगीते, लोकनृत्ये यांचेही दर्शन ग्रंथातून घडते. अनेक विद्या, शास्त्रे यांचे उल्लेख विस्ताराने आले आहेत उदा. प्रल्हादविद्या, अंतरिक्षगमन विद्या, क्षेपणिक व त्याची अस्त्रविद्या, चौरंगी विद्या, शांभवी, शाक्त, अनुभव विद्या, हटयोग विद्या, गोपाळमंत्र विद्या, वेदविद्या इत्यादी या विद्या शास्त्रांच्या उल्लेखावरून त्याकाळी अस्तित्वात असलेल्या विद्यांची आपणाला कल्पना येते. या काळी समाजातील अस्तित्वात असणाऱ्या खेळांचा विचार करता कवडे, सरिपाट, खडखांबुला, नदीकाठच्या ओल्या वाळूची देवळे बांधणे, कोलदांडू इ. खेळांचा उल्लेख लीळाचरित्रामध्ये आला आहे. सिमगा, पाडवा अशा सणांच्या उल्लेखावरून तत्कालीन सण-समारंभ यांची कल्पना येते. प्रत्यक्ष चक्रधरांनी होळीत रंग उडविणल्याचा उल्लेख आहे. त्याचबरोबर खाद्यपदार्थांचेही उल्लेख अनेक ठिकाणी आल्याने त्यावेळच्या आहारात कोणते पदार्थ असायचे याची कल्पना येते. थोडक्यात, लीळाचरित्र या ग्रंथामुळे आपणाला तत्कालीन समाजाचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील वातावरण कसे होते? लोकांची संस्कृती कशी होती ? या संदर्भातील ज्ञान मिळते, म्हाइंभटाने अत्यंत बारकाव्यासहित या सर्व गोष्टींचे दर्शन घडविल्यामुळे हा ग्रंथ म्हणजे तत्कालीन समाजजीवनाचा आरसा बनून राहिला आहे.

**संदर्भ:-**

१. लीळाचरित्र - संपा. डॉ. वि. भि. कोलते, साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९८२.

२. लीळाचरित्र एक अभ्यास, वि. दा. कुलकर्णी, व्हीनस, प्रकाशन पुणे १९६७.